नगर परिषद वाशिम जि. वाशिम
MUNICIPAL COUNCIL WASHIM DIST. WASHIM

दुरध्वनी क्र. 07252 -232131 टोल फ्री क्र. - 1800 233 3127

ईमेल - coud.washim@maharashtra.gov.in वेब साईट - www.washimmahaulb.maharashtra.gov.in
ईमेल - mcwashim@gmail.com वेब साईट - www.washimmc.in

नपवा/नियो/ कार्या-14/अ.मंजुरी/जा.क्र./3873 / 2022 दिनांक 23 / 2 /2022

TENTATIVE APPROVAL FOR DEMARCATION LAND / SUB DIVISION LAYOUT .

प्रति,

श्री.पुरणकुमार लालचंद बदलाणी

रा.वाशिम जि.वाशिम

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 45 अन्वये सादर केलेल्या मौजा गोदेंश्वर येथील सर्व्हे नं 30/3 क्षेत्रफळ 1.98 हेक्टर आर जागेचे निवासी प्रयोजना करिता सादर केलेल्या अभिन्यासाला तात्पूरती मंजूरी प्रदान करणे बाबत.

संदर्भ :- आपला आ.क्र. 1247/2022दिनांक 11.02.2022 रोजीचा विनंती अर्ज.

उपरोक्त विषयी मौजा गोदेंश्वर येथील सर्व्हे नं 30/3 क्षेत्रफळ 1.98 हेक्टर आर जागेचे निवासी वापरा करिता प्रस्तावित अभिन्यास आवक क्र.1247/2022 दिनांक 11.02.2022अन्वये या कार्यालयास तात्पूरती मंजूरी मिळणे बाबत प्रकरण सादर केले आहे. त्यानुषंगाने सदर प्रस्तावित अभिन्यास नकाशाची पडताळणी केली असता ते मा. उपअधिक्षक, भुमी अभिलेख वाशिम यांनी दिलेल्या मो.र.क्र. 590 तातडी-पोट हिस्सा-2020 दि.03.11.2020 प्रमाणे व मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदी नूसार असल्याने सादर केलेल्या प्रस्तावित अभिन्यासाला निवासी वापरा करिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर अधिनियम,1966 चे कलम 45 तसेच महाराष्ट्र नगर परिषंदा, नगर पंचयाती व औद्योगिक वसाहती 1965 चे कलम,189 मधील तरतूदीनूसार खालील अटी व शर्तीला अधिन राहून अभिन्यासाला तात्पूरती मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

1) तांत्रिक मंजुरीच्या अभिन्यास नकाशातील सर्व विकासाची कामे जसे रस्ते, भुयारी गटार, पिण्याचे पाणिची व्यवस्था, पुल,कलवर्ट, पथदिवे इत्यादी बांधकाम मुख्याधिकारी यांचे समाधान होई पर्यंत दोन वर्षाच्या आत स्वखर्चाने करुन नगर परिषदेस विनामुल्य हस्तांतरीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. 2.7.2 नूसार वरील विकासाची कामे 02 वर्षाच्या आत स्वखर्चाने करुन घेणे बंधंनकारक राहील. सदर विकासाची कामे 02 वर्षात न केल्यास भुखंड विक्रि करता येणार नाही. तसेच या कार्यालया मार्फत बांधकाम परवानगी देता येणार नाही. भविष्यात वरील कामे नगर परिषदे मार्फत करुन देण्यात येणार नाही. तसेच भुखंड धारकांचे भुखंड विक्री करतांना निर्देशनास आणून देणे बंधंनकारक राहील. तसेच भुखंड विक्री केल्यांनतर अभिन्यासातील भुखंड धारकांनी नोंदणीकृत संस्था निर्माण करावी व खुली जागा रस्ते ईत्यादी सेवा व सूविधेची देखरेख व व्यवस्थेची सर्वस्व जबाबदारी संस्थेकडे सोपविण्यात यावी.

..2..

2) अनुक्रमांक 01 मधील प्राथमिक विकासाचे बांधकाम नगर परिषद मार्फत करावयाचे झाल्यास नगर परिषदेने तयार केलेल्या अंदाजपत्रका नूसार रक्कम नगर परिषदेस जमा करावी लागेल.

3) सदरची विकास परवानगी फक्त आपल्या मालकीच्या जमीनी विकसीत करण्यासाठी मर्यादित असून आपल्या मालकीच्या नसलेल्या जमिनीवर विकसीत करण्यासाठी नाही.

4) आदर्श एकत्रिकृत विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील अनुच्छेद क्र. 3.4.2. मध्ये नमुद तरतुदी नूसार अभिन्यासातील खुली जागा सदर अभिन्यासातील भुखंड धारकांनी तयार केलेल्या संस्थेच्या मालकीने करावी . सदर खुली जागे बाबत आपले कोणतेही अधिकार राहणार नाही. तसेच भुखंड धारकांनी तयार केलेल्या संस्था नोंदणकृते होई पर्यंत खुली जागा देखरेख व व्यवस्थे करिता मुख्याधिकारी नगर परिषद वाशिम कडे राहील.

5) सदर अभिन्यासातील भुखंड नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व परवानगी शिवाय विभाजन करता येणार नाही.

6) सदर अभिन्यासातील भुखंडावर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व परवानगी शिवाय कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

7) आपण दाखल केलेले कागदपत्रे, नकाशे खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात यावे.

8) भविष्यात उत्तरेकडील रस्त्याच्या मालकीबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्यास संमतीलेखात नमुद लिहुन घेणार व लिहुन देणार जबाबदार राहतील.

9) प्रस्तावित अभिन्यासाखालील जागेचे क्षेत्रफळ 20,000.00 चौ.मी. कमी असल्याने मंजुर UDCPR मधील नियम क्र. 3.6 नुसार इलेक्ट्रीक टार्सफार्मर सब स्टेशन करीता Power Supply Company च्या सल्याप्रमाणे जागा Electric Substation करीता प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

10) स्थावर संपदा (विनिमय व विकास) अधिनियम, 2016 (महारेरा) कडे आवश्यक असल्यास नोंदणी करण्याची सर्वस्व जबाबदारी आपली राहील.

मुख्याधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
नगर परिषद, वाशिम

प्रत :- मा. उपअक्षधिक,भुमी अभिलेख कार्यालय,वाशिम